# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ / कार्तिक २०, १९४३ (शके)

## सदस्यांना अटक, अटकाव, स्थानबध्दता, सुटका इत्यादीबाबत

९१. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांना सहायक संचालक, सक्तवसुली संचालनालय, मुंबई यांचेद्वारे कळविण्यात आले आहे की, केंद्रीय अन्वेषण संस्था, नवी दिल्ली (सी.बी.आय) यांचेद्वारे दि.२१ एप्रिल, २०२१ रोजी नोंद करण्यात आलेल्या FIR No. RC2232021A0003 दिनांक २१/०४/२०२१ च्या आधारे सक्तवसुली संचालनालयाद्वारे (Money laundering case) प्रकरणी (Prevention of Money laundering Act, 2002) च्या कलम ४ नुसार शिक्षा पात्र असलेले प्रकरण क्र.ECIR NO. ECIR/MB20-I/66/2021 या अधिनियमाच्या कलम ३ नुसार दाखल करण्यात आले आहे.

यासंदर्भात असेही कळविण्यात आले आहे की, Prevention of Money Laundering Act, 2002 मधील तरतुदींच्या अधीनतेने या प्रकरणात करण्यात आलेल्या तपासादरम्यान श्री. अनिल वसंतराव देशमुख, विधानसभा सदस्य, काटोल मतदारसंघ यांना सक्तवसुली संचालनालय, मुंबई झोनल कार्यालय -१ यांचेद्वारे दि.०२.११.२०२१ रोजी त्यांचा Money laundering गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याने त्या कायद्यानुसार सर्व कायदेशीर बाबींची प्रक्रिया पूर्ण करुन अटक करण्यात आली आहे.

तत्पश्चात श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांना दिनांक ०२/११/२०२१ रोजी मा.विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आल्यावर त्यांचेविरुध्द सादर करण्यात आलेली वस्तुस्थिती व आधारसामुग्री विचारात घेऊन मा.विशेष न्यायालयाने श्री. अनिल देशमुख, वि.स.स. यांचा ताबा दिनांक ६ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत सक्तवसुली संचालनालयास सूपूर्द केलेला आहे.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०२१.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कक्ष.
३) संगणक कक्ष (Website)